राज्यातील खाजगी अंशत: व पुर्णत: अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्थेतील व अध्यापक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे माहे जानेवारी, २०१८ चे वेतन ऑफलाईन पध्दतीने वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : वेतन १२१८/प्र.क्र.२८/१८/टीएनटी-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०२ फेब्रुवारी, २०१८

संदर्भ :- १) संचालक, पाठयपुस्तक मंडळ, पुणे ४ तथा समिती प्रमुख माहिती तंत्रज्ञान गट यांचे दि. २७.०१.२०१८ चे पत्र.
२) या विभागाचे ई-गव्हर्नन्स १५१८/प्र.क्र.६/१८/संगणक, दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ चे पत्र.

प्रस्तावना :-

वरील विषयाच्या संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये संचालक, पाठयपुस्तक मंडळ, पुणे ४ तथा समिती प्रमुख माहिती तंत्रज्ञान गट, पुणे यांनी शालार्थ प्रणालीच्या डाटा बेस सॉफ्टवेअरमध्ये दिनांक १२.०१.२०१८ पासून तांत्रिक दोष निर्माण झाला असल्याने शालार्थ प्रणाली बंद पडली असल्याचे कळविले आहे. शालार्थ प्रणालीसाठी Microsoft चा support घेणे, DIT कडून जादा स्पेस निर्माण करुन घेणे इत्यादी कारणांमुळे ही प्रणाली लवकर सुरु करणे शक्य नाही. शालार्थ प्रणालीवर सद्यस्थितीत ५.७० लाख शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन ऑनलाईन पध्दतीने काढण्यात येते. शालार्थ प्रणालीमध्ये निर्माण झालेली तांत्रिक अडचण दूर करण्यास काही कालावधी लागणे अपेक्षित आहे. त्यामुळे सदर शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे माहे जानेवारी, २०१८ चे वेतन ऑफलाईन पध्दतीने अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील खाजगी अंशत: व पुर्णत: अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्थेतील व अध्यापक विद्यालयातील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे माहे जानेवारी, २०१८ चे वेतन ऑफलाईन पध्दतीने अदा करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे :-

१) माहे डिसेंबर, २०१७ मध्ये ज्या शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन शालार्थ प्रणालीमधून अदा झाले आहे त्या शिक्षकांचे वेतन, माहे जानेवारी महिन्यात ऑफलाईन प्रणालीतून माहे डिसेंबर, २०१७ च्या वेतन देयकाच्या आधारे सादर करण्यात यावे.

२) माहे डिसेंबर, २०१७ मध्ये जे कर्मचारी सेवानिवृत्त झाले असतील किंवा स्वेच्छानिवृत्ती घेतली असेल किंवा अन्य कारणामुळे सेवेत नाहीत अशा कर्मचाऱ्यांची नावे माहे जानेवारी महिन्याच्या वेतन देयकामधून वगळण्यात यावी.

३) माहे डिसेंबर, २०१७ मधील वेतन देयकानुसार वेतन भत्ते परिगणित करुन वेतन देयक सादर करण्यात यावे. केवळ आयकर वजाती व्यक्तीनिहाय प्रत्यक्ष तपशिलानुसार देयकात कपात करुन दर्शवावा. तसेच जे कर्मचारी निलंबित झाले असतील अशा कर्मचाऱ्यांना निलंबनाच्या नियमाप्रमाणे निर्वाह भत्ता द्यावा.

सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १०९/व्यय-५, दिनांक ३०.१.२०१८ व अनौपचारिक संदर्भ क्र.९/२०१८/कोषा प्रशा-४, दिनांक ३१.१.२०१८ च्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०३१३०३४७२३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila D Chaudhari

Digitally signed by Charushila D Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99d7dca0e63be1bd1b7158b9523537dcc1d46bc807768647a9ed4ff3816ecf3, cn=Charushila D Chaudhari
Date: 2018.02.03 13:08:33 +05'30'

(चारुशीला चौधरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल मुंबई
२) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४) महालेखापाल, (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई, नागपूर
५) महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई, नागपूर
६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
७) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
८) शिक्षण संचालक (प्राथमिक) , महाराष्ट्र राज्य, पुणे
९) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१०) संचालक, विद्यापरिषद, पुणे
११) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१२) सर्व शिक्षणाधिकारी / शिक्षण निरीक्षक (माध्यमिक / प्राथमिक)
१३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१४) सर्व अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/माध्यमिक)
१५) वित्त विभाग (व्यय-५ / कोषा प्रशा-४), मंत्रालय, मुंबई
१६) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अर्थसंकल्प कार्यासन / संगणक शाखा
१७) निवड नस्ती-टिएनटी-३